
ePaper
उद्धव ठाकरेंना मोठा धक्का, बडा नेता भाजपच्या गळाला, उद्या मोठा पक्षप्रवेश?
| वर्ष - 9 | अंक -77 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत

- थोरला फ्लॉप, धाकट्याने मैदान गाजवलं!
- इंडिया चॅम्पियन झाल्यानंतर ICCचा निर्णय!
- काँग्रेस म्हणजे मुसलमान!
- मतचोरी करुन बनलेल्याची जमीन चोरी

www.mahaenews.com | रविवार, दि. 9 नोव्हेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**निवडणूकीचा रणसंग्राम:** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे स्पष्ट संकेत

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ‘स्वबळावर!

## पुरंदर, दौंड, शिरूर, जुन्नर, खेड, आंबेगाव, मुळशी तालुक्यांतील बैठकीत चर्चा

| पुणे | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**राज्यात महायुतीचे सरकार असले तरी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढण्याचे संकेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवारी दिले. “महायुती म्हणून एकत्र लढायचे ठरले असले, तरी स्थानिक पातळीवरील वास्तव आणि मतप्रवाह वेगळे आहेत. त्यामुळे निवडणुकीबाबतचा अंतिम निर्णय स्थानिक नेत्यांना घेऊ देण्यात येईल,” असे स्पष्ट करत अजित पवार यांनी स्वबळाचा नारा दिला आहे.**



### महायुतीत एकत्र, पण निर्णय स्थानिक पातळीवर

राज्य आणि केंद्रात तीन पक्षांचे महायुती सरकार कार्यरत आहे. अजित पवार म्हणाले. “पूर्वी ठरल्याप्रमाणे महायुतीतील तिन्ही पक्षांनी एकत्रित निवडणुका लढवाव्यात, अशी भूमिका होती. पण, आता स्थानिक पातळीवरील कार्यकर्ते वेगवेगळे मतप्रवाह मांडत आहेत. आरक्षण जाहीर झाल्यानंतर परिस्थितीचा आढावा घेऊन प्रत्येक जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांना निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य दिले जाईल.”
त्यांनी यावेळी हेही लक्षात आणून दिले की, महाविकास आघाडीत असतानाही लोकसभा आणि विधानसभा निवडणुका वगळता उर्वरित सर्व निवडणुका काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने स्वतंत्रपणे लढवल्या होत्या. त्यामुळे, “स्थानिक निवडणुकांमध्ये स्वबळावर जाणे ही नवी गोष्ट नाही,” असा सूचक इशाराही त्यांनी दिला.

### कार्यकर्त्यांचा वाढता उत्साह

पुणे जिल्ह्यातील पुरंदर, दौंड, शिरूर, जुन्नर, खेड, आंबेगाव, मुळशी या तालुक्यांतील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी अजित पवार यांनी सविस्तर संवाद साधला. या बैठकीत माजी जिल्हाध्यक्ष सुरेश घुले, आमदार ज्ञानेश्वर कटके, माजी आमदार दिलीप मोहिते, शंकर मांडेकर आणि अतुल बेनके यांची उपस्थिती होती. बैठकीदरम्यान अनेक नवीन कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला. मुळशी आणि भोर तालुक्यांतील विविध पक्षांतील नेते तसेच चाकण शहरातील शिवसेना (उबाठा गट) च्या महिला शहरप्रमुख विजया जाधव यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करत पक्षाला नवे बळ दिले.

- स्थानिक नेत्यांना निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य
- भोरमध्ये थोपटे भाजप विरुद्ध राष्ट्रवादी अशी थेट लढत शक्य
- आठ वर्षांनंतरच्या निवडणुकांपूर्वी नवे समीकरण तयार
- आरक्षणानंतर स्थानिक परिस्थितीनुसार रणनीती ठरणार

### “आरक्षण पडल्यानंतर निर्णय” — अजित पवार

अजित पवार म्हणाले,“गेल्या काही दिवसांपासून आम्ही प्रत्येक तालुक्याचा आढावा घेत आहोत. कार्यकर्त्यांमध्ये उत्साह आहे. आरक्षण जाहीर झाल्यानंतर स्थानिक परिस्थितीचा अभ्यास करून निवडणुकीची दिशा ठरवली जाईल. महायुतीतील तीन पक्ष एकत्र आहेत, पण स्थानिक स्तरावरील मतभेदांनाही आम्ही दुर्लक्ष करणार नाही.”पुढे ते म्हणाले, “शिवसेनेचे नेते विजय शिवतारे यांच्याशी चर्चा झाली आहे. त्यांनी म्हटले आहे की आरक्षण पडू द्या, इच्छुकांची संख्या पाहू, त्यानंतरच एकत्रितपणे निर्णय घेऊ.”

### आठ वर्षांनंतरच्या निवडणुका – बदललेले राजकीय चित्र

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तब्बल आठ वर्षांनंतर होत आहेत. या कालावधीत राज्यातील राजकीय समीकरणांमध्ये मोठे बदल झाले आहेत. नवे पक्ष उदयास आले, जुने आघाड्या तुटल्या, काही नव्या जोडण्या झाल्या. अजित पवार म्हणाले, “राजकारणात नवीन चेहरे आणि नवे पक्ष आले आहेत. प्रत्येकालाच संधी हवी असते, हे स्वाभाविक आहे. स्थानिक परिस्थिती आणि कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास पाहूनच निवडणुकीचा मार्ग ठरवला जाईल.”

### भोरमध्ये थोपटे भाजप विरुद्ध राष्ट्रवादी लढत निश्चित

बैठकीदरम्यान भोर आणि मुळशी तालुक्यातील महत्त्वाचा राजकीय घडामोडींचाही साक्षीदार झाला. भोरचे आमदार शंकर मांडेकर यांच्या उपस्थितीत भोर नगरपालिकेच्या भाजप नगराध्यक्षा निर्मला आवारे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.या पार्श्वभूमीवर मांडेकर म्हणाले,“भोरमध्ये सध्याची भाजप म्हणजे संग्राम थोपटे यांची भाजप आहे. आम्ही राष्ट्रवादी म्हणून ठामपणे लढणार आहोत. पक्षाने स्थानिक नेत्यांना निर्णय घेण्याचा अधिकार दिला आहे.

## राष्ट्रवादीत प्रवेशाची लाट, कार्यकर्त्यांचा उत्साह वाढला

मुळशी, भोर, दौंड, शिरूर, आंबेगाव अशा तालुक्यांतून विविध पक्षांतील नेत्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश सुरु असल्याचे चित्र आहे. अजित पवार यांनी यावेळी नवागत कार्यकर्त्यांचे स्वागत करत सांगितले, “राष्ट्रवादी ही सर्वसामान्य माणसाची पक्षसंघटना आहे. जो प्रामाणिकपणे काम करेल, त्याला पक्ष नेहमी पुढे नेईल.” राजकीय पातळीवर पाहता, अजित पवार यांची ‘स्वबळा’वरील भूमिका ही फक्त राजकीय रणनीती नसून, भविष्यातील स्थानिक सत्तासमीकरणांसाठीची दिशा आहे. स्थानिक पातळीवर असलेले मतभेद मिटविण्याऐवजी त्यांना प्रत्यक्ष प्रतिनिधित्वाची संधी देऊन पवार यांनी स्थानिक संघटनांचे अस्तित्व टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. आगामी काही आठवड्यांत आरक्षण जाहीर झाल्यानंतर, जिल्हानिहाय उमेदवार निश्चिती आणि प्रचाराची रूपरेषा ठरवली जाणार आहे. त्यानंतरच महायुतीतील तीन पक्षांच्या समन्वयाची खरी परीक्षा होईल.

## बनावट कागदपत्रांच्या आधारे घोटाळाः बोपोडी जमीन प्रकरणात खडसेंचा मोठा खुलासा

# पुण्यात आणखी 1500 कोटींचा गैरव्यवहार!

। पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**कोरेगाव पार्क येथील जमीन गैरव्यवहार प्रकरण सध्या चांगलेच चर्चेत आहे. यादरम्यान पुण्यातील बोपोडी येथे बनावट कागदपत्रांच्या आधारे सरकारी जमीन बळकावल्याचा आणखी एक प्रकार उजेडात आला आहे. याप्रकरणी गुन्हा देखील दाखल करण्यात आला आहे. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते एकनाथ खडसे यांनी आज पत्रकार परिषद घेत या घोटाळ्यासंबंधी सविस्तर माहिती दिली आहे. पुणे शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेली ही सुमारे १५०० कोटीची जमीन कशी नावावर करण्यात आली याबद्दल खडसे यांनी मोठे खुलासे केले आहेत.**

## तीनशे कोटी रुपयांना विकत घेतली



खडसे म्हणाले की, काल पुणे येथील खडक पोलीस ठाण्यात एक एफआयआर दाखल झाला. हा एफआयआर हेमंत गावंडे, राजेंद्र विद्वांस, ऋषिकेश विद्वांस, मंगल विद्वांस तसेच विद्यानंद पुराणिक, जयश्री संजय एकबोटे, शीतल तेजवानी, दिग्विजय अमरसिंह पाटील यांच्याविरोधात झाला. सर्वे नं. ६२, फायनल प्लॉट नं. १४ बोपोडी १४ या गट नंबरसंबंधी आहे. हा गट नंबर १५ एकरचा आहे. या सर्वांनी बनवट कागदपत्रे तयार करून त्यांनी ही जमीन आपल्या नावावर करून घेतल्याचा गुन्हा आहे, अशी माहिती एकनाथ खडसे यांनी दिली आहे.ही जमीन फार पूर्वी पेशव्यांची जमीन होती, त्या काळात भट म्हणून एक कुटुंब होतं. त्या कुटुंबाला पेशव्यांनी उदर निर्वाहासाठी ही जमीन दिली होती. त्यामध्ये एक अट होती की, कुटुंबामध्ये जोपर्यंत मुलगा होत राहिल तोपर्यंत राहिल मुलगी जन्माला आली तर हा अधिकार राहाणार नाही. त्या कुटुंबात जोपर्यंत मुलगा होता तोपर्यंत हा अधिकार त्यांच्याकडे राहिला नंतर मुलगी जन्माला आल्यानंतर हा अधिकार संपला. ही जमीन सरकारजमा झाली. नंतर १८८३ पासून ही सरकारी जमीन आहे. १९२० साली ही जमीन कृषी महाविद्यालयासाठी देण्यात आली. तेव्हापासून ही कृषी विभागाकडे आहे. ही जमीन अत्यंत महत्त्वाच्या ठिकाणी आहे. शिवाजीनगर परिसरातील या जमीनीला मोठा भाव आहे. आजचा बाजारभावाप्रमाणे याची किंमत पाहिली तर पंधराशे कोटीं रूपयांच्या आसपासची ही जमीन आहे, असे एकनाथ खडसे म्हणाले.१५०० कोटी रूपयांची ही जमीन विद्वांस कुटुंबाला हाताशी धरून हेमंत गावंडे, तेजवानी या कंपीनीने आम्ही कूळ आहोत असे कागदपत्रे तयार केले. ही जमीन

### ही फाइल माझ्याकडे होती

पण तरीही त्यावर पुढे कारवाई झाली नाही, असे एकनाथ खडसे म्हणाले.दरम्यानच्या काळात हा टीडीआरचा प्रस्ताव माझ्याकडे प्रलंबित होती. यावर मी आदेश दिला होता की, ही जमीन आपली आहे आणि ही कोणालाही देता कामा नये. मधल्या काळात त्यांनी ही जमीन आपल्या नावावर लावण्याचा आणि टीडीआर मिळवण्याचा प्रयत्न केला आणि त्यांनी तो मिळवला. ही जमीन त्यांनी २०१५ च्या काळात मिळवली. कृषीमंत्री या नात्याने ही फाइल माझ्याकडे होती

कृषी महाविद्यालयाच्या अखत्यारीत असताना त्यांनी हा प्रकार २००९ पासून सुरू केला. तेव्हापासून या जमीनीचा पाठपुरावा केला जात होता, असा आरोप एकनाथ खडसे म्हणाले.पुण्याच्या डीपी प्लॅनमध्ये ही मोकळी जमीन पुणे ट्रान्सपोर्ट विभागाला रिझर्वेशनसाठी दाखवण्यात आली, त्यामुळे ही पडून राहिली. पण तरीही ही जमीन आमची आहे असे दाखवून त्यांनी कागदपत्रे तयार करून सरकारकडे अपील केलं. हेमंत गावंडे यांनी तेथील जिल्हाधिकाऱ्यांकडे जमीन परत देण्याची मागणी केली. जिल्हाधिकाऱ्यांनी ते नाकारलं. त्यानंतर ते आयुक्तांकडे गेले. आयुक्तांनी देखील ही सरकारी जमीन असल्याचा निर्णय दिला. त्या निर्णयाविरोधात त्यांनी मंत्र्यांकडे अपील केलं, त्यांनीही नाकारल्यानंतर ते उच्च न्यायालयात गेले. न्यायालयाने सरकारला चार आठवड्यात निर्णय घेण्यास सांगितल्यानंतर ती फाइल सरकारकडे आली आणि परत सरकारने ती नाकारली.२०१४ च्या सुमारास याच्यावर टीडीआर मिळावा म्हणून त्यांनी पुणे महापालिकेकडे अर्ज केला. फाइल अंतिमतः टीडीआरचा पैसा देण्याच्या संदर्भात मंजूरीपर्यंत आली, यादरम्यान २०१४ च्या काळात जेव्हा मी विरोधपक्षनेता होतो, तेव्हा हा विषय माझ्या लक्षात आणून देण्यात आला. त्यानंतर मी सरकार आणि आयुक्तांना पत्र लिहिलं. ज्यामध्ये या जागेचा टीडीआर मंजूर करू नये अशी सूचना मी सरकारला केली.


# भरधाव दुचाकी थेट बस स्थानकाला आदळली

## लोखंडी पट्ट्यात दुचाकी चालकाच डोकं अडकलं

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**घाई संकटात नेई याचा प्रत्येय पिंपरी- चिंचवडमध्ये पाहायला मिळाला. बीआरटीमधून भरधाव वेगात जाणारा दुचाकीचा अपघात होऊन चालकांच डोकं थेट बीआरटी बस स्थानकातील लोखंडी पट्ट्यात अडकलं. या विचित्र अपघाताचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. अजित लक्ष्मण कद्रू वय- ३२ अस जखमी झालेल्या तरुणाच नाव आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जखमी अजित कद्रू हा शुक्रवारी मध्यरात्री एक च्या सुमारास वाकड येथील बीआरटीमधून भरधाव जात असताना दुचाकीवरील संतुलन बिघडल्याने बस स्थानकाच्या लोखंडी पट्ट्याना धडकली. दुचाकीचा वेग इतका होता की, चालकाच अजित कद्रूच डोकं थेट पट्ट्यांच्या मधोमध अडकलं. नशीब बलवत्तर असल्याने तो थेट लोखंडी पट्ट्यांवर आदळला नाही. अन्यथा जीवाला धोका झाला असता. अजितने हेल्मेट घातले असते तर अधिक उपयोगी पडले असते. तो जखमी देखील झाला नसता. अशी माहिती पोलिसांनी दिली.अजित जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्याच्या

### अन्यथा जीवाला धोका झाला

व्हायरल होत आहे. अजित लक्ष्मण कद्रू वय- ३२ अस जखमी झालेल्या तरुणाच नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जखमी अजित कद्रू हा शुक्रवारी मध्यरात्री एक च्या सुमारास वाकड येथील बीआरटीमधून भरधाव जात असताना दुचाकीवरील संतुलन बिघडल्याने बस स्थानकाच्या लोखंडी पट्ट्याना धडकली. दुचाकीचा वेग इतका होता की, चालकाच अजित कद्रूच डोकं थेट पट्ट्यांच्या मधोमध अडकलं. नशीब बलवत्तर असल्याने तो थेट लोखंडी पट्ट्यांवर आदळला नाही. अन्यथा जीवाला धोका झाला असता.

डोक्याला गंभीर इजा झालेली आहे. लोखंडी पट्ट्या ओढून त्याला बाहेर काढण्यात आल. नशीब बलवत्तर असल्याने या विचित्र अपघातातून तो थोडक्यात बचावला आहे. अशी माहिती पोलीस उपनिरीक्षक मारणे यांनी दिली आहे.घाई संकटात नेई याचा प्रत्येय पिंपरी- चिंचवडमध्ये पाहायला मिळाला. बीआरटीमधून भरधाव वेगात जाणारा दुचाकीचा अपघात होऊन चालकांच डोकं थेट बीआरटी बस स्थानकातील लोखंडी पट्ट्यात अडकलं.

**पीएमपी बसचा वेग मंदावला** | **बसचालकांबरोबरच प्रवाशांनाही नाहक मनस्ताप**

# निगडी ते दापोडी 'बीआरटी' मार्ग बंद!

## बीआरटी मार्गिका आधी मेट्रो आणि आता पाइपलाइनच्या कामासाठी बंद

पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**निगडी ते दापोडी बस रॅपिड ट्रान्झिट (बीआरटी) मार्गिका आधी मेट्रो आणि आता पाइपलाइनच्या कामासाठी बंद ठेवण्यात आली आहे. यामुळे पीएमपी बसचा वेग मंदावला आहे. तसेच प्रवाशांना सेवा रस्त्यावर बसची वाट पाहावी लागत आहे. बसचालकांबरोबरच प्रवाशांनाही नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे.**




पीएमपी बससाठी निगडी ते दापोडीदरम्यान १२.५० किलोमीटरची स्वतंत्र 'बीआरटी' मार्गिका बांधण्यात आली. पण, गेल्या काही वर्षांपासून ही सेवा विस्कळित झाली आहे. सुरुवातीला स्वारगेट ते पिंपरी मेट्रो कामासाठी अनेक ठिकाणी 'बीआरटी' मार्गिका उखडली होती. त्यामुळे पिंपरी ते दापोडीपर्यंत ही सेवा विस्कळित झाली होती. पहिल्या टप्प्यात ६ मार्च २०२२ रोजी पिंपरी ते दापोडी मेट्रो सेवा सुरू झाली. त्यानंतर 'बीआरटी' मार्गिका दुरुस्त करण्यात आली. मात्र, बऱ्याच ठिकाणी 'बीआरटी'ची दुरवस्था कायम होती. आता पिंपरी ते निगडी मेट्रो कामासाठी निगडीकडून दापोडीकडे जाणाऱ्या मार्गावर अनेक ठिकाणी 'बीआरटी' मार्गिका उखाडली आहे. तर दापोडी ते निगडीकडे जाणाऱ्या मार्गावर निगडी ते दापोडीपर्यंत पाइपलाइन टाकण्यासाठी 'बीआरटी' मार्ग खोदला आहे. त्यामुळे निगडी ते दापोडी 'बीआरटी' मार्गाची दोन्ही मार्गावरची सेवा गेल्या काही महिन्यांपासून विस्कळित झाली आहे. 'बीआरटी' मार्ग विविध ठिकाणी खंडीत केल्यामुळे पीएमपी बस सेवा रस्त्यांवरुन धावत आहे. परिणामी, या बस वाहतूक कोंडीत अडकत असल्यामुळे चालकांबरोबरच प्रवाशांनाही मनस्ताप सहन करावा लागत आहे. मेट्रो कामासाठी बजाज कंपनी, आकुर्डी, चिंचवड अशी विविध 'बीआरटी' स्थानके काढून टाकली आहेत. तर पाइपलाइनसाठी खराळवाडी, पिंपरी, मोरवाडी, इम्पायर इस्टेट, जयश्री टॉकीज, काळभोरनगर ही स्थानके बंद करण्यात आली आहेत. त्यामुळे प्रवाशांना बस मिळवण्यासाठी सेवा रस्त्यावर उभे राहावे लागत आहे. त्यामुळे सुरक्षितता धोक्यात आली आहे.

दोन्ही बाजूंचे 'बीआरटी' मार्ग सुरू असताना जाण्यासाठी आणि येण्यासाठी प्रत्येकी अर्धा तास लागत होता. मात्र, आता सेवा रस्त्यावरुन बस जात असल्याने सरासरी एक तास लागत आहे. काही वेळा उशीर झाला म्हणून बसच्या फेऱ्यादेखील रद्द कराव्या लागतात. पीएमपीएमएल 'बीआरटी' मार्ग अनेक ठिकाणी विस्कळित झाल्यामुळे कधी-कोणता बस स्टॉप सुरू होतो, ते समजत नाही. त्यामुळे कधी बाहेरच्या बाजूला रस्त्यावरुन बससाठी थांबावे लागते. बसही कोंडीत अडकत आहे. त्यामुळे प्रवासासाठी खूप वेळ लागत आहे. अशा तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत.

> पाइपलाइन टाकण्याचे काम पूर्ण झाले, तेथे लवकरात लवकर बीआरटी मार्ग पूर्ववत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. पाइपलाइनची चाचणी झाली, की 'बीआरटी' दुरुस्तीचे काम सुरू होईल. **-अजय सूर्यवंशी,** सहशहर अभियंता, महापालिका

---

# पिंपरी चिंचवड शहर स्वच्छतेसाठी ओला व सुका कचरा स्वतंत्र द्या!

## पिंपरी चिंचवड महापालिका आरोग्य विभागाच्या वतीने शहरवासियांना आवाहन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड शहरातील अनेक नागरिक कचरा वर्गीकरणाचे नियम पाळत असले तरी, अद्यापही काही भागांमध्ये ओला व सुका कचरा एकत्र दिला जात आहे. त्यामुळे नागरिकांनी ओला व सुका कचरा वर्गीकरणाबाबत असणारे नियम पाळून सहकार्य करावे, असे आवाहन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.**




घनकचरा व्यवस्थापन अधिनियमानुसार प्रत्येक नागरिकाने घरगुती तसेच व्यावसायिक कचऱ्याचे वर्गीकरण करून देणे बंधनकारक आहे. या अनुषंगाने महापालिकेच्या वतीने शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असतात. या उपक्रमांमधून नागरिक, विद्यार्थी आणि व्यावसायिकांमध्ये 'कचरा विलगीकरण हीच खरी स्वच्छतेची गुरुकिल्ली आहे' अशी जाणीव दृढ केली जात आहे.

तसेच महापालिकेने कचरा विलगीकरणाच्या दृष्टीने सोसायट्या आणि संस्थांना दोन वेगवेगळ्या रंगांचे डबे उपलब्ध करून दिले असून त्यांचा योग्य वापर केल्यास कचऱ्याचे प्रभावी वर्गीकरण होईल. या प्रक्रियेमुळे पुढील टप्प्यांमध्ये कंपोस्टिंग, पुनर्वापर आणि पुनर्निर्मिती सुलभ होईल. त्यामुळे नागरिकांनी ओला व सुका कचरा वर्गीकरण करून स्वच्छ, आरोग्यदायी व पर्यावरणपूरक शहरनिर्मितीत सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

### निरीक्षण पथकांची नियुक्ती

महापालिकेच्या आरोग्य विभागाने यासाठी स्वतंत्र निरीक्षण पथके नियुक्त केली आहेत. ही पथके दररोज कचरा संकलनावेळी विलगीकरणाची तपासणी करतात. विलगीकरण न करणाऱ्या नागरिकांवर, सोसायट्यांवर किंवा व्यावसायिक आस्थापनांवर नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे.



> पिंपरी चिंचवड स्वच्छ व सुंदर ठेवणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. नागरिकांनी कचरा वर्गीकरणाचे नियम पाळून सहकार्य करावे, जेणेकरून शहरातील घनकचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी आणि पर्यावरणपूरक होईल.
> **—विजयकुमार खोराटे,**
> अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

> पिंपरी चिंचवड महापालिका प्रशासनाने स्वच्छतेसाठी अनेक उपक्रम राबवले आहेत, परंतु नागरिकांचा सक्रीय सहभाग सर्वात महत्त्वाचा आहे. प्रत्येक घर आणि संस्थेने जबाबदारपणे कचरा विलगीकरण केल्यास आपले शहर 'स्वच्छतेचा आदर्श' ठरेल.
> **—डॉ. प्रदीप ठेंगल,** उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका




**केंद्रीय निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणुकीची घोषणा केली त्या दिवसापासून देशभर निवडणुकांसाठीची आदर्श आचारसंहिता लागू झाली. आदर्श आचारसंहितेचे अंतिम ध्येय मतदारांनी निर्भयपणे आणि कोणत्याही दबावास बळी न पडता मतदानाचा अधिकार बजावावा हेच आहे. नवी लोकसभा अस्तित्वात आल्यावर आदर्श आचारसंहितेचा कालावधी समाप्त होईल.**

# आचारसंहिता : रोखठोक तरीही मानवी!




आचारसंहितेच्या तरतुदींची पूर्तता केंद्र सरकार, राज्य सरकार याचबरोबर सर्व महामंडळे आणि शासकीय अर्थसाहाय्यित संस्थांना करावी लागते. आदर्श आचारसंहितेमधील सर्वसामान्य तरतुदी सर्वांनाच लागू होतात आणि त्यामध्ये निवडणुकीला उभ्या राहणाऱ्या इच्छुक उमेदवारांचाही समावेश होतो.आदर्श आचारसंहितेनुसार संबंधित यंत्रणेची योग्य पद्धतीने आगाऊ परवानगी घेऊन निवडणूक प्रचाराचे सर्व कार्यक्रम करणे राजकीय पक्षांवर आणि उमेदवारांवर बंधनकारक आहे. प्रचार मिरवणुकीमुळे वाहतुकीला अडथळा होणे अपेक्षित नाही. प्रचाराची किंवा मिरवणुकीची परवानगी म्हणजे सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनात अडथळा आणण्याची परवानगी नव्हे! सर्व राजकीय पक्षांना निवडणूकविषयक सभांसाठी मैदाने आणि आवश्यकता असल्यास हेलिपॅडची सुविधा सारख्या प्रमाणात उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे. त्यामध्ये कोणत्याही पक्षाला अथवा उमेदवारासाठी झुकते माप देणे अपेक्षित नाही. आचारसंहितेच्या कालावधीत सरकारी खर्चाने शासकीय योजनांची जाहिरात करता येत नाही. सत्तारूढ पक्षाच्या मंत्र्यांना निवडणूक प्रचाराचे काम आणि शासकीय कामकाज यांची सरमिसळ करता येत नाही. सरकारी कामकाजासाठी जनतेचा पैसा वापरला जातो आणि म्हणून सरकारी खर्चातून स्वत:ची, स्वत:च्या पक्षाची प्रसिद्धी करणे उचित नाही. तो आचारसंहितेचा भंग ठरतो.आचारसंहितेच्या काळात सरकारतर्फे राबविण्याच्या नव्या प्रकल्पांची अथवा कार्यक्रमांची घोषणा करता येत नाही. कुठल्याही प्रकारचे आर्थिक अनुदान किंवा त्यासंबंधीचे आश्वासन देता येत नाही. पायाभरणी समारंभांसारखे कार्यक्रम आचारसंहितेच्या काळात करता येत नाहीत. सत्तारूढ पक्षाच्या बाजूने मतदारांवर प्रभाव पडू शकेल अशा गोष्टी प्रतिबंधित आहेत. यंत्रणेमार्फत आणि राजकीय सहभाग न घेता अत्यावश्यक कामे मात्र हाती घेता येतील. या तरतुदींमागील उद्दिष्ट लक्षात घेतले पाहिजे. निवडणूक काळात सरकारी यंत्रणा एखाद्या पक्षाच्या दावणीला बांधणे आचारसंहितेला अभिप्रेत नाही. तरी, पूर्णतेच्या टप्प्यावर असलेल्या सार्वजनिक हिताच्या बाबी वापरात आणण्यासाठी आचारसंहितेमुळे विलंब होऊ नये अशी निवडणूक आयोगाची भूमिका आहे. आचारसंहितेच्या कालावधीत शासनाच्या नव्या योजनांना मान्यता देणे आणि राजकीय पदाधिकाऱ्यांनी लाभार्थीकेंद्री योजनांचा आढावा घेणे आचारसंहितेचे उल्लंघन ठरते. अशा योजना पूर्वीपासून चालू असल्या तरी हे बंधन लागू आहे. कल्याणकारी योजनांसाठी निधी आणि शासकीय कामांची कंत्राटे देता येणार नाही. त्यासाठी आयोगाची परवानगी घ्यावी लागेल. खासदार आणि आमदार इत्यादींचे त्यांच्या निधीमधून घेण्यात आलेल्या वाहनांवरील नाव झाकणे अपेक्षित आहे. अन्यथा तो संबंधित लोकप्रतिनिधीचा निवडणूक प्रचार मानला जातो. असा खर्च उमेदवाराच्या निवडणूक खर्चामध्ये गणला जातो. यंदा लोकसभेच्या मतदारसंघासाठी उमेदवाराच्या निवडणूक खर्चाची कमाल मर्यादा ९५ लाख रुपये आहे. आचारसंहितेबद्दलचे निर्देश केवळ निवडणूक आयोग देऊ शकतो. राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय आयोगाचे प्रतिनिधित्व करत असते. राज्यभरात आयोगाच्या वतीने निवडणूक संचालित करण्याचे काम पाहात असते. आचारसंहितेच्या कालावधीत राज्य सरकारकडून आयोगाकडे पाठविण्याचे सर्व संदर्भ राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून जावे लागतात. काही प्रकारची कामे संबंधित शासकीय यंत्रणा आयोगापर्यंत न जाताही सुरू ठेवू शकतात. उदा. सर्व प्रकारच्या मान्यता आणि परवानग्या प्राप्त झालेली आणि प्रत्यक्ष सुरू असलेली कामे किंवा लाभार्थींची नावे आचारसंहितेच्या आधीच जाहीर झालेले प्रकल्प, जाहीर केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे आंतरराष्ट्रीय स्तरावरील निविदांचे मूल्यमापन आणि अंतिम करण्याचे काम इत्यादी.

## प्रासंगिक »

# घंटागाडी बरी...

***सद्या:स्थितीत आपल्यासमोरची आव्हाने काय आहेत, याचे भान राज्यातील राजकारण्यांस असल्याच्या खुणा शोधूनही सापडणार नाहीत.***

दशकभराच्या संसारानंतर घटस्फोटित पती-पत्नींचे एकमेकांविषयी अद्वातद्वा बोलणे आणि महाराष्ट्रातील राजकीय भाषणबाजी यांत तूर्त काहीही फरक नाही. प्रेमात पडण्याच्या तरल काळात एकमेकांसाठी सूर्यचंद्र तोडून आणण्याची भाषा करणारे घटस्फोटानंतर एकमेकांची किरकोळ उणीदुणीही काढू लागतात त्याप्रमाणे महाराष्ट्रातील राजकीय पक्षांचे झाले आहे. आपण कोणत्या काळात आहोत, आपल्यासमोरची आव्हाने काय, आपणास स्पर्धा कोणत्या प्रांतांशी करावयाची आहे, त्यासाठी काय करावे लागेल, आपले प्रतिस्पर्धी किती तगडे आहेत... अशा कोणत्याही म्हणून मुद्द्यांचे भान राज्यातील राजकारण्यांस असल्याच्या खुणा शोधूनही सापडणार नाहीत. हे सर्व रमले आहेत त्यांच्या त्यांच्या भूतकाळात! कोणी कोणाच्या पाठीत खंजीर खुपसला आणि कोणी कोणास दगा दिला.

भारताचा विख्यात बुद्धिबळपटू, माजी जगज्जेता विश्वनाथन आनंद वयाच्या १७ व्या वर्षीपर्यंत 'ग्रँडमास्टर' बनला नव्हता. १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर आनंद ज्युनियर जगज्जेता बनला. गुकेश त्या वयाचा होईपर्यंत बहुधा बुद्धिबळातील सीनियर जगज्जेता बनलेला असेल.

# भारतीय बुद्धिबळप्रेमी फारसे पडणार नाहीत



आनंदने बुद्धिबळात जे मिळवले, ते अतुलनीय खरेच. पण त्याची गादी चालवणारा भारतात कोणी तयार होईल का, या प्रश्नाचे उत्तर शोधण्याच्या फंदात आता भारतीय बुद्धिबळप्रेमी फारसे पडणार नाहीत. कारण गुकेशच्या रूपात त्या प्रश्नाचे खणखणीत उत्तर मिळाले आहे. १२व्या वर्षीच गुकेश ग्रँडमास्टर बनला. या खेळाच्या इतिहासातील सर्वात युवा ग्रँडमास्टर बनण्याचा त्याचा विक्रम अवघ्या १७ दिवसांनी हुकला! भारताच्या ताज्या दमाच्या युवा ग्रँडमास्टरांच्या गटामध्ये गुकेश सर्वात तरुण. सुरुवातीच्या वर्षांमध्ये त्याच्यापेक्षा आर. प्रज्ञानंद, निहाल सरीन, अर्जुन एरिगेसीसारख्या उदयोन्मुख बुद्धिबळपटूंनी अधिक चमक दाखवली होती. तरीदेखील प्रसिद्धीचा किंवा प्रतिकूल तुलनेचा जराही परिणाम खेळावर होऊ द्यायचा नाही, ही समज गुकेशमध्ये खूप आधीपासून दिसून येते. ही परिपक्वता, त्या जोडीला मानसिक कणखरपणा आणि एकाग्रता या गुकेशच्या जमेच्या बाजू. आनंद आणि प्रज्ञानंद यांच्याप्रमाणेच गुकेशही चेन्नईकर. त्या शहरात एकामागोमाग एक गुणवान बुद्धिबळपटू कसे निर्माण होतात हा स्वतंत्र अभ्यासाचाच विषय ठरेल.कँडिडेट्स स्पर्धेमध्ये यंदा खुल्या आणि महिला गटात मिळून विक्रमी पाच भारतीय बुद्धिबळपटू उतरले होते. एके काळी असा संख्यात्मक दबदबा पूर्वाश्रमीच्या सोव्हिएत महासंघाकडून दिसायचा. महाराष्ट्राचा विदित गुजराथी, गुकेश आणि प्रज्ञानंद; तसेच महिला गटात कोनेरु हम्पी आणि आर. वैशाली यांनी कँडिडेट्स स्पर्धेपर्यंत मजल मारली होती. गुकेशसह प्रत्येकाने या स्पर्धेत काही ना काही छाप पाडलीच. भारतीय बुद्धिबळपटूंना या स्पर्धेत फार संधी मिळणार नाही, असे भाकीत बहुतेक माजी बुद्धिबळपटू आणि विश्लेषकांनी व्यक्त केले होते. त्याचा फारसा परिणाम खेळावर होऊ न देता, प्रत्येकाने आपला सर्वोत्तम खेळ करण्याचा प्रयत्न केला. काही थक्क करणारे विजय नोंदवले, तसेच काही वेळा खंतावणारे पराभवही पाहिले. हम्पी वगळता साऱ्यांसाठी हा नवीन अनुभव होता. गुकेशच्या बाबतीत परिस्थिती बऱ्यापैकी प्रतिकूल होती. स्पर्धा सुरू होण्याच्या वेळी तो सर्वात युवा बुद्धिबळपटू होताच, शिवाय क्रमवारीमध्येही सहावा होता. किमान तीन खेळाडूंना सर्वाधिक संधी आहे यावर बहुतांचे एकमत होते. अमेरिकेचे फॅबियानो करुआना आणि हिकारु नाकामुरा आणि रशियाचा इयान नेपोम्नियाशी हे तिघेही यापूर्वी कँडिडेट्स खेळलेले आहेत. नेपोम्नियाशीने तर दोन वेळा ही स्पर्धा जिंकलेली आहे. या तिघांचे आव्हान मोडून गुकेश सर्वात युवा कँडिडेट्स विजेता बनला.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## चाकणकरांवर गंभीर आरोप रुपाली पाटील यांनी घेतली अजित पवारांची भेट

# पक्षाची नोटीस नाही खुलासा पत्र!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षातील रुपाली ठोंबरे पाटील आणि रुपाली चाकणकर यांच्यातील संघर्ष गेल्या काही दिवसांपासून राजकीय वर्तुळात चर्चेत आला आहे. चाकणकर या राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्ष असून त्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष सुद्धा आहेत. आज रुपाली पाटील यांनी अजित पवार यांची भेट घेतली या भेटीत त्यांनी अजित पवारांकडे चाकणकरांची तक्रार केल्याची माहिती दिली आहे.**

## चाकणकरांबद्दल केली तक्रार





राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाच्या नेत्या रुपाली पाटील ठोंबरे यांच्या बाबत माधवी खंडाळकर यांनी मागील आठवड्यात सोशल मिडीयावर वादग्रस्त पोस्ट केली होती. त्यावरून रुपाली पाटील ठोंबरे यांची बहीण प्रिया सुर्यवंशी, वैशाली पाटील, पूनम गुंजाळ आणि अमित सुर्यवंशी या चौघांनी माधवी खंडाळकर यांना मारहाण केल्याची घटना घडली होती. त्या प्रकरणी रुपाली पाटील ठोंबरे यांची बहीण, मावशी यांच्यासह अन्य दोघांविरोधात खडक पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.यानंतर महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी माधवी खंडाळकर यांच प्रकरण पुढे आणले आहे. या पदाचा रुपाली चाकणकर यांनी गैरवापर केला आहे.त्या माध्यमातून माझ्या कुटुंबातील सदस्यावर गुन्हा दाखल करण्यात आल्याचा आरोप रुपाली पाटील ठोंबरे यांनी केला होता, यानंतर रुपाली पाटील यांना काल पक्षाकडून एक शिस्तभंगाची नोटीस पाठविण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर आज पाटील यांनी पक्षाचे प्रमुख आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. या भेटीत नेमकी काय चर्चा झाली याबद्दलही रुपाली पाटील ठोंबरे बोलल्या आहेत.मला पक्षाची नोटीस नाही तर पक्षाचे खुलासा पत्र काल रात्री दिले आहे. मी जे काही महिला आयोगाच्या अध्यक्षा आणि महिला प्रदेश अध्यक्षा यांच्याबाबतीत माध्यमांमध्ये वक्तव्य केलं त्याचा खुलासा पक्षाने मागितला आहे.

त्यासाठी सात दिवसांचा कालावधी दिला आहे. आणि कायदेशीर खुलासा मी देणार आहे," असे रुपाली पाटील ठोंबरे म्हणाल्या.वादाचा प्रसंगाचा वाद पोलीस ठाण्यात गेल्यानंतर तो वाद संपवला होता. त्यानंतर दुसऱ्या

### पक्षाकडून एक शिस्तभंगाची नोटीस

मावशी यांच्यासह अन्य दोघांविरोधात खडक पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.यानंतर महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी माधवी खंडाळकर यांच प्रकरण पुढे आणले आहे. या पदाचा रुपाली चाकणकर यांनी गैरवापर केला आहे. त्या माध्यमातून माझ्या कुटुंबातील सदस्यावर गुन्हा दाखल करण्यात आल्याचा आरोप रुपाली पाटील ठोंबरे यांनी केला होता, यानंतर रुपाली पाटील यांना काल पक्षाकडून एक शिस्तभंगाची नोटीस पाठविण्यात आली आहे.

दिवशी तातडीने माधवी खंडाळकर यांनी सीपींना तक्रार दिली आणि गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर मी पोलिसांकडे गेले आणि त्यांनी माधवी खंडाळकर आणि त्यांच्या भावावर गुन्हा दाखल केला आहे, असेही रुपाली पाटील म्हणाल्या. तसेच माधवी खंडाळकरांचा गुन्हा कोणाच्या सांगण्यावरून दाखल करण्यात आला याचाही तपास व्हावा म्हणून सीपींकडे मी अर्ज केला आहे. हे कोणी प्लॅन केलं? कारण माधवी खंडाळकर यांच्याशी सहा वर्ष कसलाही संबंध नसताना अचानक त्यांनी.... फलटन महिला डॉक्टरचे जेव्हा राज्याच्या महिला आयोगाच्या अक्षयक्षा चारित्र्यहनन करत होत्या आणि त्यावर मीडियामध्ये टीकेची झोड उठली तेव्हा मी सांगितलं की पक्षाचं आणि महिला आयोगाचं कामकाज वेगळं आहे. पक्षाचा त्याच्याशी संबंधी नाही, त्याच २८ तारखेला माधवी खंडाळकर पोस्ट केली. ज्यामध्ये त्यांनी रुपाली पाटील यांना तुम्ही पद का दिलं? तुम्ही पक्षात का घेतलं? असं म्हटलं होतं, असेही रुपाली पाटील म्हणाल्या.राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाच्या नेत्या रुपाली पाटील ठोंबरे यांच्या बाबत माधवी खंडाळकर यांनी मागील आठवड्यात सोशल मिडीयावर वादग्रस्त पोस्ट केली होती. त्यावरून रुपाली पाटील ठोंबरे यांची बहीण प्रिया सुर्यवंशी, वैशाली पाटील, पूनम गुंजाळ आणि अमित सुर्यवंशी या चौघांनी माधवी खंडाळकर यांना मारहाण केल्याची घटना घडली होती.

## ५० हजार विद्यार्थ्यांकडून गीता पठणाचा विश्वविक्रम

## गीता पठण कार्यक्रमाने नागपूरच्या भूमीवर शनिवारी ऐतिहासिक विश्वविक्रम

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्या "जागर भक्तीचा" या आध्यात्मिक उपक्रमांतर्गत गीता परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गीता पठण कार्यक्रमाने नागपूरच्या भूमीवर शनिवारी ऐतिहासिक विश्वविक्रम प्रस्थापित केला. ३०२ शाळांमधील ५ वी ते बारावीपर्यंतच्या ५२,५५९ विद्यार्थ्यांनी एकत्र येत भगवद्गीतेचे बाराव्या, पंधराव्या आणि सोळाव्या अध्याय एकाच सुरात पठण केले.**

हा सामूहिक पठण सोहळा वर्ल्ड रेकॉर्ड बुक ऑफ इंडिया, इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स या तीन संस्थांनी अधिकृतरीत्या नोंदवला.नागपुरातील ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या पटांगणावरील या उपक्रमाला गीता परिवारचे संस्थापक अध्यक्ष श्रीराम जन्मभूमी न्यासाचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी महाराज, केंद्रीय भूपृष्ठ वाहतूकमंत्री व खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे प्रणेते नितीन गडकरी, सामाजिक कार्यकर्त्या कांचनताई गडकरी, आमदार प्रवीण दटके, गीता परिवारचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय मालपानी,



आशुजी गोयल, समितीचे अध्यक्ष प्रा. अनिल सोले, रेणु अग्रवाल यांची उपस्थिती होती.गीतेचे अर्थ, उच्चार आणि तत्त्वज्ञान विद्यार्थ्यांना शिकवणारे श्रीनिवास वर्णेकर व वंदना वर्णेकर यांचा नितीन गडकरी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. वर्ल्ड रेकॉर्ड बुक ऑफ इंडियाचे संजय व सुषमा नार्वेकर, इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स मनोज तत्ववादी यांची यावेळी उपस्थिती होती. यावेळी मंचावर असलेल्या विद्यार्थ्यांनी

### भगवद्गीता जीवनाची मार्गदर्शिका

भागात गीता पठणासारखे उपक्रम राबवले पाहिजे. भगवद गीता ही जीवनाची मार्गदर्शिका असून प्रत्येकाने तिचा अवलंब केल्यास उत्तम, सफल, सार्थक आणि योग्य व्यक्ती घडतील. जगातील सर्व ग्रंथाचे सार या ग्रंथात आहे, असे स्वामी गोविंददेव गिरी महाराज म्हणाले.

गीता पठणाला सुरुवात केली. त्यांच्या सुरात पटांगणावर असलेल्या हजारो विद्यार्थ्यांनी सुर मिळसले. या सामूहिक पठणाने वातावरण भारावून गेले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेणुका देशकर यांनी केले.गीता पठणाचा हा विश्वविक्रमाचा क्षण आनंद आणि अभिमानाचा आहे. भगवद्गीता जीवनाचे तत्वज्ञान आहे. लहान मुलांवर गीता पठणातून उत्तम संस्कार व्हावे, जीवन जगयाचा योग्य मार्गावर जाण्याची प्रेरणा मिळावी, हा उद्देश आहे. मागील वर्षी वंदेमातरम व मनाचे श्लोकचा विक्रम झाल्यानंतर या वर्षीचा हा ऐतिहासिक सोहळा खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचा उपक्रम सर्वांना प्रेरणा देईल.

## रेवंत रेड्डींचा आरोप

## रेड्डींच्या वक्तव्याने पोटनिवडणुकीत आरोपांचा धुरळा

# काँग्रेस म्हणजे मुसलमान!

### समुदायाची फसवणूक केल्याचा आरोप



।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**ज्युबिली हिल्स पोटनिवडणुकीच्या प्रचाराला जातीय वळण लागले आहे. प्रमुख पक्ष मतदारांना उघडपणे धार्मिक आवाहन करत आहेत. तेलंगणाचे मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांनी "काँग्रेस म्हणजे मुस्लिम, मुस्लिम म्हणजे काँग्रेस" असे वक्तव्य केल्यानंतर केंद्रीय गृह राज्यमंत्री बंदी संजय कुमार यांनी हिंदूंना एकत्र येऊन भाजप उमेदवाराला मतदान करण्याचे आवाहन केले.**

काँग्रेसने संजय यांच्या जातीय वक्तव्याबद्दल त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी निवडणूक आयोगाकडे केली आहे. शेखपेट विभागातील पॅरामाउंट कॉलनी येथे झालेल्या कॉर्नर सभेला संबोधित करताना, रेवंत रेड्डी यांनी काँग्रेस मुस्लिमांच्या कल्याणासाठी वचनबद्ध असल्याचे पुनरुच्चार केले आणि बीआरएसवर समुदायाची फसवणूक केल्याचा आरोप केला."केसीआर पक्ष लवकरच भाजपमध्ये विलीन होईल. मी राजकारणात आल्यापासून मी एक धर्मनिरपेक्ष नेता आहे. काँग्रेस सरकारने अल्पसंख्यांकांना अनेक संधी दिल्या. अल्पसंख्यांकांना मोठी पदे देणारी काँग्रेसच होती. काँग्रेस म्हणजे मुस्लिम आणि मुस्लिम म्हणजे काँग्रेस. अल्पसंख्यांकांच्या पाठिंब्याने मी कोडंगल विधानसभा जागा तीन वेळा जिंकली. राज्यात 20 महिन्यांच्या काँग्रेस राजवटीत अल्पसंख्यांकांना कोणतीही समस्या आली नाही," असे रेवंत रेड्डी म्हणाले.या मतदारसंघातील सुमारे चार लाख मतदारांपैकी सुमारे 1.2 लाख मुस्लिम मतदारांचा मोठा वाटा असल्याने, 11 नोव्हेंबर रोजी होणाऱ्या पोटनिवडणुकीत स्वतःचा उमेदवार उभा करण्याऐवजी काँग्रेसला पाठिंबा देण्याचा एआयएमआयएमचा निर्णय गेम चेंजर म्हणून पाहिला जात आहे. एआयएमआयएमचे अध्यक्ष आणि हैदराबादचे खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी अलीकडेच सांगितले की, ज्युबिली हिल्स पोटनिवडणुकीचा सध्याच्या सरकारच्या स्थापनेवर किंवा टिकून राहण्यावर थेट परिणाम होणार नाही, परंतु त्यांनी मतदारांना काँग्रेसचे उमेदवार व्ही. नवीन यादव यांना पाठिंबा देण्याचे आवाहन केले. रेवंत रेड्डी यांच्या वक्तव्यांना आणि मुस्लिम मतदारांना आकर्षित करण्याच्या काँग्रेस नेत्यांच्या प्रयत्नांना उत्तर देताना, गुरुवारी बोराबांडा येथे सभेत बंदी संजय म्हणाले, "जेव्हा मी लोकांना मतांसाठी टोप्या घालताना पाहतो तेव्हा मला हसायला येते, जेव्हा रेवंत रेड्डी टोपी घालतात तेव्हा अभिनेता वेणू माधवची आठवण येते. मी जवळ उभा असलेला अझरुद्दीन या मत मागणाऱ्यांवर हसताना पाहिला आहे. जर तुमच्यात हिंमत असेल तर ओवेसीच्या बहिणींना भाग्यलक्ष्मी मंदिरात घेऊन जा, त्यांच्या कपाळावर खुणा करा आणि भजन गा, तुमच्यात हिंमत आहे का? ज्युबिली हिल्सच्या मतदारांनो, काँग्रेस आणि बीआरएसला धडा द्या. त्यांना 30 टक्के मतांसाठी 70 टक्के मतांची देवाणघेवाण करू देऊ नका." बंदी संजय यांनी हिंदू मतदारांना मतदान गट म्हणून एकत्र येऊन त्यांची ताकद दाखवण्याचे आवाहन केले. "ते मुस्लिमांच्या घरी जाऊन मतं विकत घेण्यासाठी मिक्सर, ग्राइंडर आणि इतर उपकरणे देत आहेत, पण हिंदू मतदारांकडे दुर्लक्ष करत आहेत. रेवंत रेड्डी यांनी मतदानात फेरफार करण्यासाठी 40 हजार बुरखे आणले आहेत असे वृत्त आहे; तो लोकांना ते घालायला लावण्याचा आणि बनावट मतपत्रिका टाकण्याचा प्रयत्न करत आहे.

### भाजपला मतदान करण्याचे आवाहन

जर सर्व 3 लाख हिंदू मतदार एकत्र उभे राहिले तर काँग्रेस आणि बीआरएसची एकता कशी दिसते ते दाखवूया," असे ते म्हणाले.ज्युबिली हिल्स पोटनिवडणुकीच्या प्रचाराला जातीय वळण लागले आहे. प्रमुख पक्ष मतदारांना उघडपणे धार्मिक आवाहन करत आहेत. तेलंगणाचे मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांनी "काँग्रेस म्हणजे मुस्लिम, मुस्लिम म्हणजे काँग्रेस" असे वक्तव्य केल्यानंतर केंद्रीय गृह राज्यमंत्री बंदी संजय कुमार यांनी हिंदूंना एकत्र येऊन भाजप उमेदवाराला मतदान करण्याचे आवाहन केले.

# मतचोरी करुन बनलेल्याची जमीन चोरी

## पार्थ पवार जमीन घोटाळा प्रकरणी राहुल गांधींचा हल्लाबोल

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुण्यातील कोरेगाव पार्कमधील मुंढवा येथील 40 एकर जमीन पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीनं खरेदी केल्याचं प्रकरण समोर आलं आहे. बाजारभावाप्रमाणं 1800 कोटी रुपयांची जमीन केवळ 300 कोटी रुपयांना विकण्यात आली. या शिवाय राज्याच्या आयटी धोरणाचा लाभ घेत स्टॅम्प ड्युटी देखील कमी आकारण्यात आली. स्टॅम्प ड्युटी 500 रुपये आकारण्यात आली.**

पार्थ पवार यांच्या जमीन खरेदीच्या प्रकरणावरुन मोठं वादळ उठलं आहे. याच मुद्यावरुन लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मतचोरी करुन बनलेल्या सरकारनं केलेली जमीन चोरी असल्याचं म्हटलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं शांत राहणं खूप काही सांगतं, असं राहुल गांधी म्हणाले. राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना या प्रकरणी प्रश्न विचारले आहेत. महाराष्ट्रात 1800 कोटी रुपयांची सरकारी जमीन, जी दलितांसाठी आरक्षित होती, फक्त 300 कोटी रुपयांमध्ये मंत्र्यांच्या मुलाच्या कंपनीला विकण्यात आली. त्यावरील स्टॅम्प ड्युटी देखील हटवण्यात आली. म्हणजेच एक लूट आणि त्यावर कायदेशीर शिक्कामोर्तब करत सूट देण्यात आली. जे मतचोरी करुन बनलेलं सरकार आहे, त्यांच्याकडून करण्यात आलेली ही जमीन चोरी आहे. त्यांना माहिती आहे, कितीही लूट केली तरी मतचोरी करुन पुन्हा सत्तेत येऊ शकतात. तुम्ही यासाठीच शांत आहात की तुमचं सरकार त्या लुटारुंवर टिकलेली आहे, जे दलित आणि वंचितांचे अधिकार हिसकावून घेतात? राहुल गांधी यांनी दोन दिवसांपूर्वी हरियाणातील मतचोरीचा मुद्दा मांडला होता. पार्थ पवार जमीन घोटाळा प्रकरणात देखील राहुल गांधी यांनी मतचोरीचा मुद्दा आणला आहे. अमेडिया कंपनीकडून खाजगी एलएलपी आयटी कंपनी उभारली जाणार होती. यासाठी जी खरेदी विक्री केली जाणार होती, त्याच्या सहीचे अधिकार पार्थ पवारांनी दिग्विजय पाटलांना देण्याचा 22 एप्रिल 2025ला प्रस्ताव ठेवण्यात आला. या प्रस्तावाची प्रत आता समोर आलीये. या प्रस्तावानंतर 20 मे 2025 ला वादग्रस्त जमिनीचा दस्त झाला. हा दस्त दिग्विजय पाटलांच्या सहीने झाला असून पार्थ पवारांनी सहीचे दिलेल्या अधिकाराची प्रत ही सोबत जोडण्यात आलेली आहे. पार्थ पवार यांच्या अमेडिया एंटरप्रायझेस एलएलपी कंपनीनं जमीन खरेदीचा व्यवहार केल्या प्रकरणी तीन जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.



### मोदींना या प्रकरणी प्रश्न विचारले

पार्थ पवार यांच्या जमीन खरेदीच्या प्रकरणावरुन मोठं वादळ उठलं आहे. याच मुद्यावरुन लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मतचोरी करुन बनलेल्या सरकारनं केलेली जमीन चोरी असल्याचं म्हटलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं शांत राहणं खूप काही सांगतं, असं राहुल गांधी म्हणाले. राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना या प्रकरणी प्रश्न विचारले आहेत.

# कपिल शर्माच्या प्रश्नावर आमिर खानने काय दिलं उत्तर?

बॉलिवूडचा मिस्टर परफेक्शनिस्ट असं म्हटलं की आपल्यासमोर आपसूकच नाव येतं ते आमिर खानचं. आमिर खान त्याच्या चित्रपटांमुळे त्याच्या वक्तव्यांमुळे कायमच चर्चेत असतो. मुलाखतींमध्ये आमिर खान उत्तरं अशी काही देतो की त्याचे चाहतेही विचारात पडतात. याच आमिर खानने कपिल शर्माच्या द ग्रेट इंडियन कपिल शोमध्ये उपस्थिती दर्शवली होती. नेटफ्लिक्स या ओटीटी प्लॅटफॉर्मवरचा हा शो आहे. या शोचा एक प्रोमो सध्या चर्चेत आहे. त्यावरुन आमिर खान ज्या एपिसोडमध्ये येणार त्यात धमाल होणार हेच दिसतंय. एक प्रश्न आमिर खानला कपिल विचारतो तेव्हा त्याचा चेहरा मात्र पाहण्यासारखा झाला आहे.माझे मागचे दोन चित्रपट फ्लॉप झाले आहेत. पण दोनच." असं आमिर म्हणतो तेव्हा त्याला कपिल पटकन म्हणतो की तुझे फ्लॉप चित्रपटही उत्तम व्यवसाय करतात. लाल सिंग चड्ढा आणि ठग्ज ऑफ हिंदुस्थान या चित्रपटांना प्रेक्षकांनी नाकारलं. पण आमिरने ती बाब हलकेफुलकेपणात बोलून सोडून दिली आहे. पहिल्यांदाच आमिरने एखाद्या रिॲलिटी शोमध्ये उपस्थिती लावली आहे. आमिर खान रिॲलिटी शो आणि अवॉर्ड शोमध्ये फारसा जात नाही.या शोच्या प्रोमोची चर्चा चांगलीच रंगली आहे. आमिर या




शोमध्ये म्हणतो, "आज बोलताना माझ्या मनातल्या गोष्टी बाहेर येणार आहेत. मी खरं सांगतोय माझी मुलं माझं अजिबात ऐकत नाहीत." आमीर त्याच्या कपड्यांबाबतही बोलला. आमिर म्हणाला, "आज इथे येण्यापूर्वी मी काय कपडे घालायचे आहेत? यावर बरीच चर्चा झाली. त्यानंतर मी हे कपडे घालून आलो." अर्चना पूरणसिंग म्हणतात, "तू तर चांगले कपडे घातले आहेस रे." त्यावर आमिर म्हणतो, "हो पण मी शॉर्ट्समध्ये येणार होतो." ज्यानंतर सगळे हसू लागतात.या प्रोमोमध्ये अवॉर्ड शोज ना जाण्याचं कारणही आमिर खानने सांगितलं आहे. अर्चना पूरणसिंग विचारतात, तू अवॉर्ड शोमध्ये का जात नाहीस? त्यावर आमिर म्हणतो, "वेळ खूप मौल्यवान आहे, त्याचा उपयोग योग्यप्रकारे केला पाहिजे." हे ऐकूनही सगळे हसू लागतात. थ्री इडियट्स, पी. के. या चित्रपटांतल्या आठवणीही आमिरने भरभरुन सांगितल्या आहेत असं दिसतं आहे.

## अर्पिता खानला केलं जातं ट्रोल

बॉलीवूड अभिनेता आयुष शर्मा सध्या त्याच्या आगामी चित्रपट 'रुस्लान'मुळे चर्चेत आहे. २०२१ रोजी प्रदर्शित झालेल्या 'अंतिम : द फायनल ट्रुथ' या चित्रपटात तो शेवटचा झळकला होता. तीन वर्षांनंतर पुन्हा एकदा आयुष 'रुस्लान' चित्रपटाद्वारे प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. आयुषची पत्नी आणि भाईजान सलमान खानची बहीण अर्पिता खान अनेकदा तिच्या लुक्समुळे ट्रोल झालीय. चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान झालेल्या एका मुलाखतीत आयुषने अखेर या सगळ्यावर आपलं मत मांडलं आहे.सिद्धार्थ कन्ननला दिलेल्या मुलाखतीत आयुष म्हणाला, "मी जेव्हा लग्न केलं तेव्हापासून माझ्या वैयक्तिक आयुष्याबाबत खूप बोललं जातंय. खूप जणांनी माझ्या अर्पिताच्या वजनाबाबत त्यांचं मत मांडलंय. आमच्या कुटुंबाजवळ असणाऱ्या लोकांना माहीत आहे की, ती दिवसभर अहिल आणि आयतबरोबर असते. या सगळ्या गोष्टींत तिला मदत करायला कोणी इतर व्यक्ती नाही आहे.

## मतभेद सर्वत्र होतात : राणी

काजोल व राणी या दोघीही बॉलीवूडमधील ९० च्या दशकातील सुप्रसिद्ध अभिनेत्री आहेत. अजुनही सिनेसृष्टीत सक्रिय असलेल्या या दोघीही एकमेकींच्या नातवाईक आहेत. काजोलचे वडील शोमू मुखर्जी आणि राणीचे वडील राम मुखर्जी हे सख्खे चुलत भाऊ होते. त्या नात्याने काजोल व राणी या चुलत बहिणी आहेत. दोघींचं जवळचं नातं असलं तरी त्यांचं एकमेकींशी फार सख्य नाही. राणीने काजोलबद्दल एका मुलाखतीत प्रतिक्रिया दिली आहे. 'गॅलाटा प्लस' ला दिलेल्या मुलाखतीत राणीने काजोल व तिच्या नात्याबद्दल विधान केलं. ती म्हणाली, "मला वाटतं की कुटुंब एक अशी गोष्ट आहे जी तुमच्यासोबत कायम राहते. त्यामुळे जगाने तुमच्याकडे कुटुंबासारखं पाहणं गरजेचं असतं. मतभेद सर्वत्र होतात, पण मतभेदाचे कारणच नसेल तर मतभेद का व्हावेत? माझ्यात आणि काजोलमध्येही तेच झालं. जे झालं ते फक्त गैरसमज व एकमेकींशी नीट संवाद न साधल्याने झालं."राणीने काजोलशी असलेल्या मतभेदाबद्दल प्रतिक्रिया दिली आहे, त्यामुळे त्यांच्यातील दुरावा मिटल्याची चर्चा होत आहे. राणीच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास ती शेवटची 'मिसेस चॅटर्जी व्हर्सेस नॉर्वे' या चित्रपटात झळकली होती. सध्या ती तिच्या आगामी चित्रपटांच्या शूटिंगमध्ये व्यग्र आहे.काजोलबद्दल बोलायचं झाल्यास ती 'लस्ट स्टोरीज २' या नेटफ्लिक्सवरील चित्रपटात दिसली होती. याशिवाय तिची द ट्रायल नावाची वेब सीरिज चांगलीच गाजली होती. या दोन्ही ओटीटीवरील कलाकृती होत्या.काजोल व राणी या दोघीही बॉलीवूडमधील ९० च्या दशकातील सुप्रसिद्ध अभिनेत्री आहेत. अजुनही सिनेसृष्टीत सक्रिय असलेल्या या दोघीही एकमेकींच्या नातवाईक आहेत. काजोलचे वडील शोमू मुखर्जी आणि राणीचे वडील राम मुखर्जी हे सख्खे चुलत भाऊ होते.



## विकी 'छावा' चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यस्त!

'मसान', 'उरी', 'सॅम बहादूर' अशा अनेक चित्रपटांमधून आपली भूमिका चोख साकारणारा अभिनेता म्हणजेच विकी कौशल. विकी 'छावा' या त्याच्या आगामी चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. या चित्रपटात तो छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका साकारणार आहे. वर्षाच्या अखेरीस हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अशातच विकीचा या चित्रपटातील अनसीन फोटो लिक झाला असून सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होतोय. २३ एप्रिलला विकीचे 'छावा' चित्रपटाच्या सेटवरील काही फोटोज सोशल मीडियावर व्हायरल झाले. या फोटोजमध्ये विकी मोठ्या दाढी-मिशीत दिसतोय, तर त्याचे भले-मोठे केस रुद्राक्ष माळेने वर बांधलेले दिसतायत. फिकट तपकिरी रंगाचा स्लीवलेस कुरता त्याला मॅचिंग असे धोतर आणि कमरेभोवती गुंडाळलेला लाल रंगाचा कपडा, तसेच गळ्यात रुद्राक्षाच्या माळा अशा या विकीच्या परिपूर्ण लूकने चाहत्यांना भुरळ पाडलीय.छावा' चित्रपटातील अभिनेत्याचा हा लूक सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होतोय. याचाच एक फोटो एक्सवर एका चाहत्याने शेअर केला आहे. याला कॅप्शन देत त्याने लिहिलं, "कोणत्याही पात्रासारखं हुबेहूब दिसणं हे खरंच खूप कठीण काम आहे."छत्रपती शिवाजी महाराज यांचे सुपुत्र छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित हा चित्रपट असणार आहे. 'छावा' चित्रपटात विकी कौशलसह नॅशनल क्रश रश्मिका मंदानादेखील आहे. विकी छत्रपती संभाजी महाराजांच्या भूमिकेत दिसणार आहे, तर रश्मिकाने त्यांची पत्नी येसूबाई भोसले यांची भूमिका साकारली आहे. रश्मिकाने नुकतंच या चित्रपटातील तिच्या भूमिकेचे शूटिंग पूर्ण केलं. चित्रपट पूर्ण झाल्यानंतर तिने इन्स्टाग्रामवर कॅप्शन देऊन 'छावा' चित्रपटाच्या टीमला शुभेच्छा दिल्या. चित्रपटाचे दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर आणि सहकलाकार विकीचेही तिने आभार मानले.

## अनन्या पांडे आदित्य रॉय कपूरला डेट करतेय

बॉलीवूड अभिनेता चंकी पांडेची लेक अनन्या पांडे ही अभिनेता आदित्य रॉय कपूरला डेट करत आहे. दोघेही अनेकदा एकत्र व्हेकेशनला जाताना व इव्हेंट्सला जाताना पापाराझींच्या कॅमेऱ्यात कैद होतात. अनन्या व आदित्यचं नातं बॉलीवूडमधील चर्चेचा विषय आहे. आता अनन्याच्या रिलेशनशिपबाबत चंकीने प्रतिक्रिया दिली आहे. आपण आपल्या २५ वर्षांच्या मुलीवर नियंत्रण ठेवू इच्छित नाही, असं त्याने म्हटलं आहे. 'लेहरेन'ला दिलेल्या मुलाखतीत चंकीला अनन्याच्या रिलेशनशिपबद्दल आणि तिच्या मुलाखतींमध्ये ती आदित्यचा उल्लेख करते याबाबत विचारण्यात आलं. त्यावर चंकी म्हणाला, "ठीक आहे. मला वाटतं की ती २५ वर्षांची आहे, ती माझ्यापेक्षा जास्त पैसे कमावत आहे. त्यामुळे तिला हवं ते करायला ती मोकळी आहे. माझ्या २५ वर्षांच्या मुलीला तिने काय करावं हे सांगण्याची माझी हिंमत कशी होईल." चंकीने चित्रपटांमध्ये अनन्याने केलेल्या इंटिमेट सीनबद्दलही प्रतिक्रिया दिली. "मला त्या सीनबद्दल काहीच अडचण नाही. मी हॉलीवूड चित्रपटांमध्ये इंटिमेट सीन पाहिले आहेत. ते सीन करण्यात काही गैर नाही, तुम्हालाही ते स्वीकारावं लागेल," असं चंकी म्हणाला. चंकीला अनन्या व रायसा या दोन मुली आहेत. या मुली त्याच्याकडे सल्ला घेण्यासाठी येतात का? असं विचारल्यावर तो म्हणाला, "माझ्या दोन्ही मुली खरोखरच भावनाच्या (चंकीची पत्नी) खूप जवळ आहेत. जेव्हा त्यांना काही हवं असतं तेव्हा त्या मला फोन करतात, नाहीतर त्या त्यांच्या आईच्या खूप जवळ आहेत. अर्थात भावना व त्यांच्या वयात माझ्याइतकं अंतर नाही. पण जेव्हा त्यांना कोणताही सल्ला हवा असतो तेव्हा मी त्यांच्यासाठी हजर असतो."चंकीने अनन्याचं कौतुक केलं आणि तिला पहिला चित्रपट मिळाला, तेव्हाची आठवण सांगितली.



## मुशीरची शतकी खेळी
## रणजी ट्रॉफी सामन्यात मुशीरने शतकी खेळी केली

# थोरला फ्लॉप, धाकट्याने मैदान गाजवलं!

## अडचणीत असताना मुशीरचं शतक

## मुंबईसाठी आशेचा किरण बनला

धावसंख्येचे आकडे फक्त 42 आहेत. भारतीय संघात पुनरागमनाची संधी शोधणाऱ्या सरफराजसाठी हा फॉर्म चिंतेचा विषय ठरत आहे. तर दुसरीकडे, मुशीर खान मात्र सातत्यपूर्ण कामगिरीने मुंबईसाठी आशेचा किरण बनला आहे.युवा फलंदाज मुशीर खानने देशांतर्गत क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी करून पुन्हा एकदा क्रिकेट चाहत्यांचं लक्ष वेधलं आहे. फलंदाजी असो किंवा गोलंदाजी, दोन्ही जबाबदाऱ्या योग्यरित्या पार पाडत असतो.

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**युवा फलंदाज मुशीर खानने देशांतर्गत क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी करून पुन्हा एकदा क्रिकेट चाहत्यांचं लक्ष वेधलं आहे. फलंदाजी असो किंवा गोलंदाजी, दोन्ही जबाबदाऱ्या योग्यरित्या पार पाडत असतो. आता रणजी ट्रॉफीतही त्याच्या दमदार कामगिरीचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. गेल्या सामन्यात राजस्थानविरूद्ध खेळताना त्याने अर्धशतक झळकावलं होतं. आता हिमाचल प्रदेश संघाविरूद्ध सुरू असलेल्या सामन्यात त्याने दमदार शतक झळकावलं आहे. ही शतकी खेळी त्याने मुंबईचा डाव अडचणीत असताना केली आहे. मोठा भाऊ सरफराज खान स्वस्तात बाद झाला, पण छोट्या भावाने डाव सांभाळला आणि संघाला मजबूत स्थितीत पोहोचवलं..**



मुंबईने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली, परंतु सुरुवात अत्यंत खराब झाली. सलामीवीर आयुष म्हात्रे फक्त 9 धावांवर माघारी परतला, तर अनुभवी अजिंक्य राहणे 2 धावांवर बाद झाला. चाहत्यांना मोठ्या अपेक्षा असलेल्या सरफराज खानलाही या सामन्यात यश मिळाले नाही, तो लवकरच बाद झाला. तीन प्रमुख विकेट्स स्वस्तात गेल्यानंतर मुंबई अडचणीत सापडली होती, परंतु मुशीर खानने संयमी आणि तितकीच दमदार फलंदाजी करत शतक झळकावले. हिमाचलविरुद्धच्या सामन्यात मुशीरने 86 चेंडूंमध्ये अर्धशतक पूर्ण केले आणि नंतर 148 चेंडूंमध्ये शतक गाठले. त्याने आपल्या खेळीत 12 चौकार लगावले. बातमी लिहीपर्यंत मुंबईने 61 षटकांत 4 बाद 217 धावा केल्या होत्या. मुशीर खान नाबाद 101 तर सिद्धेश लाड 78 धावांवर खेळत होते. याआधी राजस्थानविरुद्धच्या सामन्यातही मुशीरने पहिल्या डावात 49 आणि दुसऱ्या डावात 63 धावांची खेळी केली होती.मुशीरचा मोठा भाऊ सरफराज खानचा मात्र फॉर्म चिंताजनकच ठरत आहे. हिमाचलविरुद्धच्या सामन्यात तो 57 चेंडूंमध्ये 16 धावा करून बाद झाला.

राजस्थानविरुद्धही त्याचे बॅट चालले नाही. पहिल्या डावात 15 आणि दुसऱ्या डावात केवळ 5 धावा करून तो बाद झाला होता. या हंगामात रणजी ट्रॉफीमध्ये सरफराजचे सर्वोच्च व्यक्तिगत धावसंख्येचे आकडे फक्त 42 आहेत. भारतीय संघात पुनरागमनाची संधी शोधणाऱ्या सरफराजसाठी हा फॉर्म चिंतेचा विषय ठरत आहे. तर दुसरीकडे, मुशीर खान मात्र सातत्यपूर्ण कामगिरीने मुंबईसाठी आशेचा किरण बनला आहे.युवा फलंदाज मुशीर खानने देशांतर्गत क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी करून पुन्हा एकदा क्रिकेट चाहत्यांचं लक्ष वेधलं आहे. फलंदाजी असो किंवा गोलंदाजी, दोन्ही जबाबदाऱ्या योग्यरित्या पार पाडत असतो. आता रणजी ट्रॉफीतही त्याच्या दमदार कामगिरीचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. गेल्या सामन्यात राजस्थानविरूद्ध खेळताना त्याने अर्धशतक झळकावलं होतं. आता हिमाचल प्रदेश संघाविरूद्ध सुरू असलेल्या सामन्यात त्याने दमदार शतक झळकावलं आहे. ही शतकी खेळी त्याने मुंबईचा डाव अडचणीत असताना केली आहे. मोठा भाऊ सरफराज खान स्वस्तात बाद झाला, पण छोट्या भावाने डाव सांभाळला आणि संघाला मजबूत स्थितीत पोहोचवलं..मुंबईने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली, परंतु सुरुवात अत्यंत खराब झाली.

सलामीवीर आयुष म्हात्रे फक्त 9 धावांवर माघारी परतला, तर अनुभवी अजिंक्य राहणे 2 धावांवर बाद झाला. चाहत्यांना मोठ्या अपेक्षा असलेल्या सरफराज खानलाही या सामन्यात यश मिळाले नाही, तो लवकरच बाद झाला. तीन प्रमुख विकेट्स स्वस्तात गेल्यानंतर मुंबई अडचणीत सापडली होती, परंतु मुशीर खानने संयमी आणि तितकीच दमदार फलंदाजी करत शतक झळकावले. हिमाचलविरुद्धच्या सामन्यात मुशीरने 86 चेंडूंमध्ये अर्धशतक पूर्ण केले आणि नंतर 148 चेंडूंमध्ये शतक गाठले. त्याने आपल्या खेळीत 12 चौकार लगावले.

बातमी लिहीपर्यंत मुंबईने 61 षटकांत 4 बाद 217 धावा केल्या होत्या. मुशीर खान नाबाद 101 तर सिद्धेश लाड 78 धावांवर खेळत होते. याआधी राजस्थानविरुद्धच्या सामन्यातही मुशीरने पहिल्या डावात 49 आणि दुसऱ्या डावात 63 धावांची खेळी केली होती.मुशीरचा मोठा भाऊ सरफराज खानचा मात्र फॉर्म चिंताजनकच ठरत आहे. हिमाचलविरुद्धच्या सामन्यात तो 57 चेंडूंमध्ये 16 धावा करून बाद झाला. राजस्थानविरुद्धही त्याचे बॅट चालले नाही. पहिल्या डावात 15 आणि दुसऱ्या डावात केवळ 5 धावा करून तो बाद झाला होता.

# इंडिया चॅम्पियन झाल्यानंतर ICCचा निर्णय!

## थेट वर्ल्ड कप फॉरमॅटमध्ये बदल, निर्णय ऐकून सगळे थक्क

## 2.1 कोटी प्रेक्षकांनी पाहिला सामना

त्यामुळे दोन्ही उपांत्य सामने आणि अंतिम सामना भारतात खेळवण्यात आला. भारत आणि दक्षिण आफ्रिकेदरम्यान खेळल्या गेलेल्या फायनलला जिओहॉटस्टारवर तब्बल 18.5 कोटी प्रेक्षकांनी पाहिलं, जे पुरुष टी20 विश्वचषक 2024 च्या फायनलइतकंच आहे. संपूर्ण स्पर्धेला 44.6 कोटी लोकांनी पाहिलं, तर अंतिम सामना एकाच वेळी 2.1 कोटी प्रेक्षकांनी पाहिला.

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक 2025 मध्ये भारतीय संघाने अप्रतिम कामगिरी करत ऐतिहासिक विजेतेपद पटकावलं. कर्णधार हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील टीम इंडियाने अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेला 52 धावांनी पराभूत करत पहिल्यांदाच विश्वविजेतेपदावर आपलं नाव कोरलं. फायनल संपल्यानंतर अवघ्या आठवड्याभरातच आयसीसीनं पुढील विश्वचषकाच्या फॉरमॅटमध्ये मोठा बदल जाहीर केला आहे.**



शुक्रवारी झालेल्या बोर्ड बैठकीत आयसीसीनं महिला विश्वचषकातील संघसंख्या वाढवण्यास मंजुरी दिली. भारत आणि श्रीलंकेत झालेल्या विश्वचषकाच्या अभूतपूर्व यशाचं श्रेयही आयसीसीनं या निर्णयाला दिलं. आता महिला विश्वचषकात 10 संघ खेळणार आहे. आयसीसीनं प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे की,

"या स्पर्धेच्या यशाला पुढे नेण्यासाठी आयसीसी बोर्डाने पुढील विश्वचषक 10 संघांपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे." 2025 च्या विश्वचषकात 8 संघ होते. निवेदनात पुढे असंही नमूद करण्यात आलं की, "सुमारे 3 लाख प्रेक्षकांनी स्टेडियममध्ये येऊन सामने पाहिले, जे महिला क्रिकेटच्या इतिहासातील सर्वाधिक आहेत.

यासोबतच टीव्ही आणि डिजिटल व्यूअरशिपनंही नवे विक्रम प्रस्थापित केले."महिला एकदिवसीय विश्वचषक 2025 ने प्रेक्षकसंख्येच्या आणि प्रसारणाच्या बाबतीत नवे उच्चांक गाठले. भारत आणि श्रीलंका हे या स्पर्धेचे संयुक्त यजमान होते. पाकिस्ताननं आपले सर्व सामने श्रीलंकेत खेळले आणि लीग टप्प्यातच बाहेर पडले.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। रविवार।
। दि. 9 नोव्हेंबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## हिंजवडी आयटी पार्कमधील प्रलंबित प्रश्नांवर निवेदन

# देवाभाऊ, अजितदादांनंतर आता चंद्रकांतदादांकडून अपेक्षा!

### #UnclogHinjawadiITPark मोहिमेच्या प्रतिनिधी, आयटी कर्मचाऱ्यांच्या रोषाची घेतली

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी हिंजवडी आयटी पार्क परिसरातील दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या समस्या मिटाव्यात, यासाठी सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या #UNCLOG HINJAWADIITPARK मोहिमेच्या प्रतिनिधींनी शनिवारी राज्याचे मंत्री मा. चंद्रकांतदादा पाटील यांची भेट घेतली. यावेळी आयटी कर्मचाऱ्यांच्या याआधी या विषयावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना निवेदन देऊन पाठपुरावा करण्यात आला होता. मात्र अद्याप काही ठोस बदल दिसत नसल्याने आयटी कर्मचाऱ्यांची नाराजी वाढली आहे. त्यामुळे आता नागरिकांचे लक्ष चंद्रकांतदादांकडे लागले असून, "देवाभाउ अजितदादांनंतर आता चंद्रकांतदादांकडूनच अपेक्षा" असा सूर स्थानिक आयटी कर्मचाऱ्यांतून व्यक्त होत आहे.**

ही भेट पिंपरी-चिंचवडचे नगरसेवक ममताताई विनायक गायकवाड व संदीपअण्णा कस्पटे यांच्या निमंत्रणानुसार 'स्नेहीभेट' कार्यक्रमात घेण्यात आली. या वेळी #UNCLOG HINJAWADIITPARK मोहिमेचे सचिन गुणले, सचिन लोंढे, श्रीमती तेजस्विनी सवाई व राज मंगरुळे उपस्थित होते. बैठकीत हिंजवडीतील रस्त्यांची दुरुस्ती, वाहतुकीची कोंडी, तसेच वाकड येथील प्राधिकरणाच्या खेळाच्या मैदानाचे पालिकेत वर्गीकरण व वाकड दत्तमंदिर रस्त्यावरील प्रलंबित कामे या तीन प्रमुख मुद्द्यांवर चर्चा झाली.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी या सर्व विषयांवर गांभीर्याने लक्ष घालून, पीएमआरडीए आयुक्तांशी चर्चा करून समस्यांचे लवकरात लवकर निराकरण करण्याचे आश्वासन दिले. या वेळी आमदार शंकर जगताप, नगरसेविका ममता गायकवाड व नगरसेवक संदीप कस्पटे उपस्थित होते. निमंत्रणाबद्दल आभार मानत




सचिन लोंढे यांनी पिंपरी-चिंचवड हौसिंग सोसायटी व #UNCLOG HINJAWADIITPARK MOVEMENT तर्फे मंत्रीमहोदयांचे आभार व्यक्त केले.

हिंजवडी आयटी पार्क हे महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचे एक महत्त्वाचे केंद्र आहे. परंतु, येथे वर्षानुवर्षे रखडलेली रस्त्यांची कामे, वाहतुकीची कोंडी आणि पायाभूत सुविधांचा अभाव यामुळे आयटी कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. आम्ही सलग आठ वेळा शासनाला निवेदन दिले असून, यावेळी मंत्री चंद्रकांतदादांनी सकारात्मक

प्रतिसाद दिला आहे. आता आम्ही आशावादी आहोत की, या वेळी 'फक्त आश्वासन नव्हे तर कृती' दिसेल.

---

## बालप्रतिभांचा झंकार आणि स्वप्नांना पंख देणारा सोहळा!

### 9 नोव्हेंबर रोजी डी. वाय. पाटील ऑडिटोरियम, पिंपरी-चिंचवड येथे भव्य समारोप सोहळा

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**बालप्रतिभांना प्रोत्साहन देणाऱ्या "केअर फॉर यू फाउंडेशन" या समाजसेवी संस्थेतर्फे आयोजित राज्यस्तरीय "हंट फॉर द सीक्रेट सुपरस्टार – सिझन 4" या भव्य उपक्रमाचा ग्रँड फिनाले रविवार, दि. 9 नोव्हेंबर 2025 रोजी डी. वाय. पाटील ऑडिटोरियम, पिंपरी-चिंचवड येथे आयोजित करण्यात आला आहे.**

अल्पसंपन्न बालकांना शिक्षण, संस्कार आणि संधी देण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेली केअर फॉर यू फाउंडेशन ही संस्था 80G,




FCRA व CSR मान्यता प्राप्त असून, या उपक्रमाद्वारे महाराष्ट्रातील विविध बालसंवर्धन संस्था (CHILD CARE INSTITUTIONS) मधील मुलांना आपले कौशल्य सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देते. या स्पर्धेच्या अंतिम फेरीत राज्यभरातील ४० हून अधिक बालसंवर्धन संस्थांमधील ९० निवडक स्पर्धक सहभागी होणार असून, चित्रकला, हस्तकला, सामान्य ज्ञान आणि गायन या चार प्रमुख गटांमध्ये अंतिम सामना रंगणार आहे. यासाठी मुलांनी गेल्या काही महिन्यांपासून सातत्यपूर्ण प्रशिक्षण व प्री-फिनाले ऑडिशन दिले आहेत.

कार्यक्रमाची सुरुवात दुपारी १ वाजता भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे (ISRO) अध्यक्ष डॉ. व्ही. नारायणन यांच्यासोबतच्या संवाद सत्राने होणार आहे. ते या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून, त्यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासातून मुलांना 'अमर्याद स्वप्न पाहण्याची' प्रेरणा मिळेल.

कार्यक्रमास महाराष्ट्र पोलीस दलातील डीजी व चीफ ऑफ फोर्स वन आयपीएस कृष्ण प्रकाश हे मुख्य संरक्षक (CHIEF PATRON) आणि स्थापन सल्लागार म्हणून उपस्थित राहतील. तर, महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास मंत्री मा. अदिती तटकरे या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी राहणार आहेत. यावेळी आयुक्त नयना गुंडे, डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती मा. डॉ. पी. डी. पाटील, आदी मान्यवरांची देखील उपस्थिती राहणार आहे.

## आनंदवन येथे पाच ते सहा दिवसांपासून दूषित व दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा

# दापोडीतील नागरिक दूषित पाणीपुरवठ्याने त्रस्त!

### नागरिकांमध्ये पोटदुखी, उलट्या, जुलाब यांसारखे आजार उद्‌भवण्याची भीती



। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**दापोडी परिसरातील आनंदवन येथे गेल्या काही दिवसांपासून दूषित पाणीपुरवठा होत असल्याने येथील नागरिकांना आरोग्याच्या गंभीर समस्येला सामोरे जावे लागत आहे. आनंदवन हा परिसर प्रामुख्याने कुष्ठरोग्यांच्या वसाहतीसाठी ओळखला जातो. येथे अनेक वर्षांपासून रुग्ण आणि त्यांचे कुटुंबीय वास्तव्य करीत आहेत; परंतु मागील पाच ते सहा दिवसांपासून येथे दूषित व दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा होत असल्याने येथील नागरिक त्रस्त आहेत. केले.**

नळातून येणाऱ्या पाण्याला दुर्गंधी येत असून, त्याचा रंगही बदललेला आहे. अशा पाण्याचा वापर केल्यामुळे नागरिकांमध्ये पोटदुखी, उलट्या, जुलाब यांसारखे आजार उद्भवण्याची भीती निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे या वसाहतीत राहणारे बहुतेक नागरिक अल्प उत्पन्न गटातील असून, त्यांचे दैनंदिन उत्पन्न मर्यादित आहे. त्यामुळे ते बाजारातून शुद्ध पाणी विकत घेऊ शकत नाहीत किंवा पाणी शुद्धीकरणासाठी आवश्यक साधने विकत घेणेही त्यांच्यासाठी कठीण आहे.

महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून परिसरात दिवसाआड पाणीपुरवठा केला जातो. पाणी शुद्धीकरण प्रकल्पातून दूषित पाणी येत आहे का? की पाईपलाईनमध्ये गळती होऊन नालेतील पाणी मिसळत आहे, याची खात्री अद्यापि झालेली नाही. काही नागरिकांनी सांगितले की, पाईपलाईन परिसरात अनेक ठिकाणी जुनी व गंजलेली आहे. त्यामुळे दूषित पाणीपुरवठा होण्याची शक्यता आहे. त्वरित स्वच्छ पाणीपुरवठा करण्यासाठी परिसरातील पाईपलाईन तपासणी करून ज्या ठिकाणी गळती आहे, ती त्वरित दुरुस्त करण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

> “ दापोडी परिसरातील जलवाहिनीची पाहणी करून दोन दिवसांत सुरळीत आणि स्वच्छ पाणीपुरवठा केला जाईल. ज्या ठिकाणी गळती आहे ती थांबविली जाईल.
> **-साकेत पावरा,** उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग, ‘ह’ प्रभाग

## काकड आरतीमुळे भक्तिभाव वृद्धिंगत: खासदार श्रीरंग बारणे

### विठ्ठल रुक्मिणी मंदिरात दरवर्षीप्रमाणे काकड आरतीचे आयोजन



। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुक्ताई उद्यान, यमुनानगर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही 5 ऑक्टोबर ते 8 नोव्हेंबर 2025 या कालावधीत सालाबादप्रमाणे काकड आरतीचे आयोजन भक्तिमय वातावरणात करण्यात आले. या आरतीच्या समाप्ती निमित्त ह.भ.प. चैतन्य महाराज बाराववकर यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते.**

**महिला योजना माहिती**

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून खासदार श्रीरंग आप्पा बारणे, आमदार सौ. उमाताई खापरे, भारतीय कामगार सेनेचे उपाध्यक्ष मनोहरजी भिसे, तसेच नगरसेविका श्रीमती सुमनताई पवळे, सचिन चिखले, ह.भ.प. शशिकिरण गवळी, कमलताई घोलप, शुभांगीताई बोऱ्हाडे, तानाजी खाडे, उद्योजक तानाजी शिंदे, आशाताई भालेकर, नितीन बोन्डे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, “काकड आरतीमुळे पहाटे भक्तिभाव वाढतो, आत्मिक समाधान लाभते आणि पांडुरंगाचे आशीर्वाद सर्वांवर राहतात.” आमदार सौ. उमाताई खापरे यांच्या शुभहस्ते मंदिराच्या कळसाच्या कामाचे भूमिपूजन संपन्न झाले. तसेच मुक्ताई उद्यानातील पाथवे साठी त्यांच्या आमदार निधीतून ₹10 लाखांचा निधी मंजूर करण्यात आला असल्याची घोषणा त्यांनी केली.

यानंतर झालेल्या पांडुरंगाच्या पालखीच्या नगरप्रदक्षिणेत त्या

सुमारे 300 हून अधिक भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. काकड आरतीचे संपूर्ण नियोजन ह.भ.प. अनंत महाराज मोरे, ह.भ.प. शशिकिरण गवळी महाराज, मंगल महाराज जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. मंदिराच्या संस्थापिका आणि शिवसेना उपनेत्या सौ. सुलभाताई उबाळे, अध्यक्ष अंकुश जगदाळे, कार्याध्यक्ष तुकाराम वारंग, सहकार्याध्यक्ष संतोष सौंदणकर, सचिव अजिंक्य उबाळे, खजिनदार गणेश इंगवले, सहखजिनदार प्रदीप बेळगांवकर, उपाध्यक्ष आप्पा काळोखे आदींनी आयोजनात मोलाची भूमिका बजावली.

महाप्रसादाचे मानकरी उद्योजक तानाजी शिंदे, संतोष सौंदणकर, अजिंक्य उबाळे व नितीन बोन्डे हे होते. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी मंदिर समितीतील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व भक्तांनी अथक परिश्रम घेतले. “मुक्ताई उद्यानातील विठ्ठल रुक्मिणी मंदिर ही केवळ उपासनेची जागा नसून भक्तांना एकत्र आणणारे, समाजात एकात्मतेचा संदेश देणारे केंद्र आहे. दरवर्षी होणारी काकड आरती ही परंपरा आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. पहाटेचा हा भक्तिमय क्षण प्रत्येकाला आत्मिक शांती व सकारात्मकतेचा अनुभव देतो. या उपक्रमात स्थानिक नागरिक, मान्यवर आणि कार्यकर्त्यांनी दाखवलेली एकजूट हेच आमच्या सेवाभावाचे खरे बळ आहे.”

www.rklgis.org

RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution

RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING

# ADMISSION OPEN FOR THE YEAR 2026-27

NURSERY - STD X

What we Offer?

- CBSE Curriculum
- Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
- Digital Classrooms with AV Facilities
- Skill Development Programs:
  Robotics
  Dance, Music, Speech & Drama
  Entrepreneurship
- Focus on Holistic Development

Enroll Now!



Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!

8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046